

# कर्तृत्वाचा महामेरु

संपादक - प्रा.डॉ. साहेबराव भुकन

अथर्व पब्लिकेशन्स

कर्तृत्वाचा महामेरू
(कै. मधुकरराव चौधरी स्मृती व्याख्यानमाला आयोजित व्याख्यानांचे संपादन)

© सर्व हक्क सुरक्षित

ISBN : 978-93-91712-13-6
पुस्तक प्रकाशन क्र. ८३७

प्रकाशक व मुद्रक
युवराज भटू माळी

अथर्व पब्लिकेशन्स
धुळे : १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे- ४२४ ००१.
संपर्क : ९४०५२०६२३०
जळगाव : शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,
तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव- ४२५ ००१.
संपर्क : ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
ई-मेल : atharvapublications@gmail.com
वेबसाइट : www.atharvapublications.com

प्रथमावृत्ती : १५ ऑगस्ट २०२१
अक्षरजुळणी : अथर्व पब्लिकेशन्स

मूल्य : १५०/- रुपये

**E-Book *available on***
amazon.in ▪ GooglePlayBooks ▪ atharvapublications.com

ऑनलाइन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.



## अनुक्रमणिका


- प्रास्ताविक ........ ०५
  मा. शिरीषदादा चौधरी
- बाळासाहेब चौधरी : एक प्रेरणास्त्रोत ........ ०७
  प्रभात चौधरी
- 'कर्तृत्वाचा महामेरू'च्या निमित्ताने ........ ०९
  प्रा. डॉ. साहेबराव भुकन

१. मा. बाळासाहेबांचे बालपण व शिक्षण ........ १३
   रमेश पांडुरंग झांबरे

२. बाळासाहेबांचे जळगाव जिल्ह्याच्या विकासातील योगदान ........ २५
   प्रा. वाय. व्ही.पाटील

३. लोकसेवक बाळासाहेब आणि महाराष्ट्राची जडणघडण ........ ३१
   डॉ. एन. एन. लांडगे

४. मंत्री बाळासाहेब ........ ३९
   प्रभात रामभाऊ चौधरी

५. बाळासाहेब : एक संस्थाचालक ........ ५५
   जे. जी. ढोले

६. बाळासाहेब आणि राष्ट्रभाषा ........ ६४
   प्रा. डॉ. सरस्वती रायप्पा रटकल्ले

७. शिक्षण आणि बाळासाहेब ........................................ ६१
प्रा. साहेबराव त्र्यंबकराव भुकन

- लोकसेवक मधुकरराव चौधरी यांचा जीवनपट........................ ७६
- मा. बाळासाहेब चौधरी यांना मिळालेले पुरस्कार.................... ८६


Khirode Estd 1970

# शिक्षण आणि बाळासाहेब

प्रा. साहेबराव त्र्यंबकराव भुकन
प्र. प्राचार्य, साने गुरुजी विद्याप्रबोधिनी

महाराष्ट्रातील राजकारणाच्या भांगेतील तुळस, सामाजिक परिवर्तनाचे अग्रदूत, महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा पाया घालणारे द्रष्टे, ज्यांच्यामुळे साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्राला वेगवेगळे आयाम, क्षितिजे प्राप्त झाली, ज्यांनी महाराष्ट्राच्या शिक्षणाची दिशा आणि दशा बदलविण्यामध्ये मोलाची कामगिरी पार पाडली, त्या स्मृतिशेष बाळासाहेब चौधरी यांच्या पावन स्मृतीला विनम्र अभिवादन!

इतिहास अशी साक्ष देतो की, समृद्ध परंपरा असलेल्या सुपीक भूमीत काही लोक सतत काही विधायक कार्याचा ध्यास घेऊन ते पूर्ण करण्यासाठी सदैव धडपड करीत असतात. त्यांचे चिंतन, मनन, उक्ती, कृती ही त्याच दिशेने कार्यरत असते, त्यानुसार त्यांची स्वप्ने आकार घेत असतात आणि त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी ते अहर्निश कार्य करतात, कष्ट झेलतात. त्यांनी पाहिलेली स्वप्ने आणि ती स्वप्ने साकार करण्यासाठी केलेले विधायक प्रयत्न, हेच त्यांचे मोठेपण आणि वेगळेपण असते. असे विधायक कार्याचे स्वप्न पाहणारे आणि ते स्वप्न साकार करण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावणाऱ्यांपैकी एक म्हणजे खानदेशपुत्र लोकसेवक मधुकरराव चौधरी होत.

साहेबांना उभा महाराष्ट्र ओळखतो, ते शिक्षणमंत्री म्हणून! शिक्षण हा त्यांच्या चिंतनाचा, मननाचा, जिव्हाळ्याचा आणि आवडीचा विषय होता. शिक्षण हे आर्थिक आणि सामाजिक क्रांतीचे अमोघ शस्त्र आहे, यावर त्यांचा दृढविश्वास होता. शिक्षणातून समाजाचा विकास होतोच, यावर त्यांची श्रद्धा असल्यामुळे त्यांनी जाणीवपूर्वक शिक्षणाच्या गुणवत्तेकडे आणि प्रसाराकडे विशेष लक्ष दिले. विकासप्रक्रियेत शिक्षण हा महत्त्वाचा पायाभूत घटक असतो. कोणत्याही प्रकारच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवायची असेल, तर त्याची सुरुवात शिक्षणातूनच करावी

लागते. त्याशिवाय, खऱ्या अर्थाने विकास होऊच शकत नाही. १९६४-६६ च्या कोठारी आयोगाच्या अहवालाने शिक्षण क्षेत्र पार ढवळून निघाले होते. नव्या युगाला सामोरे जाण्यासाठी आणि समर्थ भारताची उभारणी करण्यासाठी विचार-विमर्ष होऊ लागले होते. देशपातळीवर प्रयास करणे आवश्यक वाटत होते. जेव्हा डॉ. कोठारी यांनी 'केजी टू पीजी' (K.G.To P.G.) शिक्षणाचा सर्वांगीण विचार करून आपला अभ्यासपूर्ण अहवाल सादर केला होता, तेव्हा साहेब सुदैवाने महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री होते. शिक्षणमंत्री या नात्याने त्यांनी केलेले चिंतन, मनन हे एकूणच शिक्षणाला प्रेरक ठरले.

आचार्य विनोबा भावे यांनी 'मंत्री' या शब्दाची खूप अर्थपूर्ण व्याख्या केलेली आहे. ते म्हणतात, ''मनन करतो तो मंत्री.'' कोठारी आयोगाचा अहवाल आल्यानंतर सतत त्याविषयीचे चिंतन, मनन आणि त्याच्या अंमलबजावणीचा ध्यास यांमुळे ते झपाटून गेले होते, म्हणून विनोबांनी मंत्र्यांची केलेली व्याख्या साहेबांना चपखलपणे लागू होते. कोठारी आयोगाने ज्या काही शिफारशी केलेल्या होत्या, त्याच्या उचित अंमलबजावणीची जबाबदारी साहेबांची होती. ती त्यांनी समर्थपणे निभावली. शिक्षण आणि विकास, शिक्षण आणि समाजपरिवर्तन, शिक्षणाच्या विकासात शिक्षकांची भूमिका, त्रिभाषा सूत्र, पाठ्यपुस्तके, अभ्यासक्रम, आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांचे प्रश्न, मुलींचे शिक्षण यासंबंधीच्या विचारांनी शिक्षणप्रक्रियेला साहेबांनी नवीन परिमाणे प्राप्त करून दिली. १०+२+३ हा शिक्षणाचा आकृतिबंध त्यांच्याच मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात यशस्वीरीत्या लागू करण्यात आला, ही एक ऐतिहासिक बाब म्हणावी लागेल. त्यामुळे देश पातळीपेक्षा महाराष्ट्र राज्यात कोठारी आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी अधिक दमदारपणे झालेले आढळते. त्यामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे साहेबांचे चिंतन, मनन आणि झपाटलेपण होय, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही आणि ठरूपण नाही.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाची जी झपाट्याने प्रगती झालेली आहे, तिच्या मुळाशी कुठेतरी शिक्षण असलेले आढळते. असे जरी असले तरी विज्ञान आणि तंत्रज्ञानाची गंगा समाज समर्थपणे पेलू शकेल का? हा एक गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. कोणताही समाज जी विज्ञान आणि तंत्रज्ञानाने विकासाची गंगा आणलेली आहे, ती तेव्हाच पेलू शकेल की, जेव्हा त्याला शिक्षणातून शक्ती मिळेल. साहेबांचा शिक्षणाच्या सामर्थ्यावर अतूट विश्वास होता, ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक वारसदार होते. त्यामुळे 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ते पिल्यावर गुरगुरल्याशिवाय राहणार नाही' या विचारांवर त्यांची श्रद्धा होती. समाजामध्ये आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, राजकीय अशा अनेक प्रकारच्या

प्रश्नांचा समर्थपणे मुकाबला करण्याचे सामर्थ्य शिक्षणातून निर्माण झालेच पाहिजे, अशी त्यांची धारणा होती.

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जग जवळ आलेले आहे; परंतु माणूस माणसांपासून दूर जात आहे. याचे शल्य साहेबांना सतत बोचत होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी म्हणतात,

*पाहीसनी रे लोकांचे*
*यवहार खोटेनाटे*
*तवा बोरी बाभयीच्या*
*आले अंगावर काटे...*

आणि

*अरे मानसा मानसा कधी होशील मानूस...*

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणतात, ''माणूस पक्ष्याप्रमाणे आकाशात भरारी घ्यायला शिकला, माशाप्रमाणे सागराच्या तळाशी पोहायला शिकला; परंतु पृथ्वीतलावर माणूस म्हणून वावरायला, जगायला शिकला का?''

बाळासाहेब त्यांच्या व्याख्यानांमधून, भाषणांमधून नेहमी म्हणायचे की, ''आजच्या शिक्षणातून चांगला डॉक्टर तयार होतो, चांगला वकील तयार होतो, चांगला अभियंता तयार होतो; परंतु चांगला माणूस तयार होतो का?''

'माणसाला माणूस होण्याचे' आवाहन करणाऱ्या बहिणाबाईंची, ''माणसाला माणसासारखे वावरण्याचे, जगण्याचे' आवाहन करणाऱ्या सर्वपल्लींची आणि चांगला माणूस तयार होण्याची अपेक्षा करणाऱ्या बाळासाहेबांची 'जातकुळी' एकच असल्याचे दिसून येते, असे म्हटले तर ते अनुचित ठरू नये. शिक्षणातून माणूस उभा राहिला पाहिजे, माणसाने माणसाशी माणसासारखे वागलेच पाहिजे, असे त्यांचे ठाम मत होते. म्हणून मानवतेचे, समतेचे शिक्षण देणे आवश्यक आहे, अशी त्यांची धारणा होती.

बाळासाहेबांच्या शैक्षणिक विचारांवर राष्ट्रपिता महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर आणि पूज्य साने गुरुजी यांच्या शैक्षणिक विचारांचा प्रभाव असलेला आढळतो. महात्मा गांधी यांनी शिक्षणातून 3 H (Head, Heart, Hand) यांचा विकास अपेक्षित केलेला आहे. ज्ञानात्मक, भावात्मक आणि क्रियात्मक असा संतुलित विकास होणे गांधीजींना अभिप्रेत आहे. आचार्य विनोबा शिक्षणासंदर्भात म्हणतात, ''जे खाल्ले, रुचले, पचले, रक्तात भिनले आणि कृतीत उतरले ते शिक्षण.'' विनोबा जे आत्मसात केलेले आहे ते कृतीतून दिसून आले पाहिजे, यावर प्रामुख्याने भर देताना दिसतात. गुरुदेव टागोर शिक्षणासंदर्भात म्हणतात, ''जे निसर्गातून मिळते ते शिक्षण.'' टागोरांच्या

मते, "उघड्या डोळ्यांनी निसर्गाकडे पाहा, त्यातून शिक्षण होईल, निसर्गाच्या सान्निध्यात जा, त्यातून शिक्षण घ्या." संस्कारमूर्ती पूज्य साने गुरुजींच्या मते, "मूल्यांची रुजवात करणे म्हणजे शिक्षण होय."

आपण जर जनता शिक्षण मंडळ (खिरोदा) आणि सातपुडा विकास मंडळ (पाल) या दोन्ही संस्थांच्या शाळा- महाविद्यालयांचा परिसर आणि तेथील शिक्षण डोळसपणे पाहिले तर आपणांस महात्मा गांधींचे मूलोद्योगी शिक्षण, 3H ( Head, Heart, Hand), विनोबांचे जीवनातून शिक्षण, टागोरांचे निसर्गातून शिक्षण, साने गुरुजींचे शिक्षणातून मूल्यशिक्षण आणि बाळासाहेबांचे निसर्गाच्या सान्निध्यात मूलोद्योगातून जीवनाद्वारे मूल्यांची रुजवणूक करणे म्हणजे शिक्षण होय, असे मला वाटते, ते सर्वार्थाने योग्यच आहे.

शिक्षणातून सर्वांगीण विकास व्हावा, ही अपेक्षा सर्वच जण व्यक्त करतात आणि ते रास्तदेखील आहे; परंतु दुर्दैवाने तसे होताना आढळत नाही. 3H (Head, Heart, Hand) पैकी फक्त एकाच H (Head) चा विकास (?) होत आहे. अंत:करण आणि क्रियात्मकता अत्यल्प प्रमाणात आढळून येते. मेंदू, मन आणि मनगट यांपैकी मेंदू (ज्ञान) विकसित होत आहे. जनता शिक्षण मंडळाचे माजी सचिव आणि मातीशी खेळणारे मर्मज्ञ कलावंत स्मृतिशेष मनोहर गुरुजी यांनी एक अप्रतिम शिल्प बनविले आहे. त्या शिल्पामध्ये त्यांनी त्या मानवी शिल्याचे डोके खूप मोठे बनविले, तर छातीपासून हातापर्यंतचा भाग खूपच लहान बनविला आहे. खूपच अर्थपूर्ण आणि बोलके, अंतर्मुख करणारे शिल्प आहे. गुरुजींनी प्रतीकात्मकरीत्या एकविसाव्या शतकातील मानव असा असेल की, त्याच्या फक्त डोक्याचा विकास झालेला असेल; परंतु अंत:करण आणि हातपाय 2H ( Heart, Hand) यांचा विकास मात्र झालेला नाही. हे एकांगी विकासाचे उत्तम उदाहरण म्हणून नमूद करावेसे वाटते.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे, यावर बाळासाहेबांची गाढ श्रद्धा होती. म्हणूनच त्यांनी जिल्ह्यात अनेक ठिकाणच्या कार्यकर्त्यांना बोलावून घेऊन गावातच माध्यमिक शिक्षणाची सोय करा, तुम्हाला परवानगी देतो, असे सांगून शाळा सुरू करण्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळेच आज जिल्ह्यात खेडोपाडी माध्यमिक शिक्षणाचा विस्तार झालेला आढळून येतो. जळगाव जिल्ह्यात यशवंतराव चव्हाण यांच्या मदतीने शासकीय तंत्रनिकेतन सुरू करून तंत्रशिक्षणाचा पाया घातला. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना करण्यात आणि ते विद्यापीठ खानदेशात आणण्यामध्ये त्यांनी मोलाची भूमिका निभावली होती.

शिक्षक हा सामाजिक परिवर्तनाचा अग्रदूत आहे, तो समाजिक परिवर्तनाला गती देण्याचे काम करू शकतो. "कोणताही समाज त्याच्या शिक्षणपद्धतीपेक्षा

अधिक गतिमान असू शकत नाही; त्याचप्रमाणे कोणतीही शिक्षणपद्धती शिक्षकापेक्षा अधिक गतिमान असू शकत नाही, तेव्हा ही गोष्ट स्पष्ट आहे की, शिक्षक हे स्वत: गतिशील व प्रागतिक विचारांचे असले पाहिजेत.'' यासाठी त्यांनी शिक्षक प्रशिक्षणावर सातत्याने भर दिला. एवढेच नाही, तर संस्थेमध्ये एखादे वैद्यकीय, अभियांत्रिकी महाविद्यालय न काढता (शक्य असूनदेखील) बालशिक्षण (मॉन्टेसरी केंद्र), प्राथमिक शिक्षण (अध्यापक विद्यालय), माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण आणि महाविद्यालयीन शिक्षण (साने गुरुजी विद्याप्रबोधिनी आणि सप्तपुट ललित कला भवन) स्तरावर आवश्यक असणारे शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करून वेगवेगळ्या स्तरांवर प्रशिक्षित, कुशल, राष्ट्राभिमानी, संस्कारक्षम, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारे, मूल्यांचे अधिष्ठान असलेले शिक्षक पुरविणाऱ्या प्रशिक्षण महाविद्यालयांच्या स्थापनेवर सदैव भर दिलेला दिसून येतो.

बाळासाहेबांनी शिक्षणाचे महत्त्व जाणलेले होते, शिक्षणाचे सामर्थ्य त्यांना ज्ञात होते, शिक्षणातून आर्थिक, सामाजिक क्रांती होते, परिवर्तन होते यावर त्यांचा विश्वास होता. म्हणूनच त्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या विस्तारावर, प्रसारावर भर दिलेला होता. माझ्या दृष्टीने साहेबांचा 'शेवटच्या माणसाच्या' विकासाचा ध्यास खूपच महत्त्वाचा आहे. आज आपण एकविसाव्या शतकातील वीस वर्षे पूर्ण केलेली आहेत, तरीदेखील जामन्या-गाढऱ्या येथे जाण्यासाठी सुविधा नाहीत, जंगली भाग आहे. मनात भीती निर्माण होते. मित्रहो, आज अशी परिस्थिती आहे तर साहेबांनी १९७२ मध्ये तिथे शाळा सुरू केली, किती प्रतिकूल परिस्थिती असेल? याची कल्पनादेखील करवत नाही; परंतु साहेबांनी तिथे शिक्षणाची गंगा नेऊन 'ज्ञानगंगा घरोघरी' पोहोचविण्याचे पवित्र कार्य केले. महात्मा गांधींना अपेक्षित असलेला 'अंत्योदय', विनोबांचा 'सर्वोदय', टागोरांचा 'माणूस' आणि साने गुरुजींचे 'मातृहृदय' हेच तर आहे. या सर्वांची झाक साहेबांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येते.

महात्मा फुले यांनी शूद्रांच्या अवनतीचे एक महत्त्वाचे सूत्र मांडले; ते असे,

*विद्येविना मती गेली*
*मतीविना नीती गेली*
*नीतीविना गती गेली*
*गतीविना वित्त गेले*
*वित्ताविना शूद्र खचले*
*इतके अनर्थ एका अविद्येने केले*

याचाच अर्थ असा की, विद्येने (शिक्षणाने) मती येते, मतीने नीती येते,

नीतीने गती येते, गतीने वित्त-अर्थ येते आणि माणसाची, समाजाची, राष्ट्राची प्रगती, विकास होतो, हे मर्म महाराष्ट्रात खूप थोड्या लोकांना उमगले. त्या थोड्यांमध्ये बाळासाहेबांचा समावेश होतो. म्हणूनच त्यांनी खेड्यापाड्यांत शिक्षणाचा प्रचार, प्रसार केला.

महाराष्ट्रामध्ये बाळासाहेबांपूर्वी शिक्षणमंत्री होऊन गेले. त्यांच्यानंतरदेखील अनेक शिक्षणमंत्री झाले' परंतु शिक्षणमंत्री म्हटले की, श्री. मधुकरराव चौधरी हे समीकरणच झालेले आहे. याचे कारण काय? याचा जर आपण विचार केला, तर असे निदर्शनास येते की, बाळासाहेबांनी शिक्षकांसाठी अनेक कल्याणकारी निर्णय घेतले. नव्हे; वेळप्रसंगी त्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली. कोठारी आयोगाने म्हटले आहे की, भारताचे भवितव्य शाळेच्या वर्गखोल्यांमधून आकार घेत आहे, घडविले जात आहे. याचाच अर्थ असा की, देशाच्या भवितव्याला आकार देण्याचे, साकार करण्याचे कार्य शाळेत शिक्षणातून होते आणि ते शिक्षण देतात ते शिक्षक! शिक्षकांना उद्याची, भविष्याची चिंता, काळजी यांनी ग्रासलेले असेल, उद्याची भीती त्यांच्या मनात असेल, तर ते निर्भयपणे अध्यापनकार्य करूच शकणार नाहीत. विनोबा म्हणतात, शिक्षक निर्भय असला पाहिजे. बाळासाहेबांवर विनोबांचा प्रभाव. शिक्षकाला चिंतामुक्त करण्याच्या उद्देशानेच त्यांनी १ एप्रिल १९६६ पासून शिक्षकांसाठी निवृत्तिवेतन योजना लागू केली. शिक्षकांना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागू नये, त्यांनी अध्यापनावरच लक्ष केंद्रित करावे. त्यामुळे शिक्षकांना समस्यामुक्त करण्याचा विडाच त्यांनी उचलेला होता. त्यामुळेच शिक्षकमित्र, शिक्षणमंत्री, शिक्षकांचे Friend, Philosopher and Guide म्हणून त्यांची ओळख आहे, ती अर्थपूर्णच आहे.

बाळासाहेबांनी ८ एप्रिल १९६८ रोजी महाराष्ट्राच्या शिक्षणाची दशा आणि दिशा स्पष्ट करणारी श्वेतपत्रिका विधिमंडळात सादर केली. श्वेतपत्रिकेमध्ये शिक्षणाच्या विस्तारासोबतच त्यांनी गुणवत्तेचा आग्रह धरला. तत्कालीन त्यांच्या काही सहकाऱ्यांनी आणि काही विरोधकांनी विरोध केला; परंतु नंतर ३०-३५ वर्षांनी विरोधकांना त्यांची चूक लक्षात आली आणि त्यांनी तसे मान्यदेखील केले. यावरून बाळासाहेबांचे द्रष्टेपण निदर्शनास येते. असे म्हटले जाते की, 'Prophets are ahead of their time' ही उक्ती साहेबांना चपखलपणे लागू पडते. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी इटलीचे महान क्रांतिकारक जोसेफ मँझेनी यांचे चरित्र लिहिले. त्याच्या प्रथम पृष्ठावर जोसेफ मँझेनीचे एक अर्थपूर्ण वाक्य उद्धृत केलेले आहे; ते असे - 'There is no vision, they perish.' या जोसेफ मँझेनीच्या वाक्याचा श्वेतपत्रिकेचे जरी वरवर अवलोकन केले, तरी प्रत्यय

ल्यावाचून राहत नाही.

बाळासाहेबांच्या शिक्षण विचारांमध्ये ज्ञान, विज्ञान आणि आत्मज्ञान यांचा अप्रतिम संगम झालेला दिसून येतो. केवळ ज्ञान असेल तर एकांगीपणा, एकारलेपण येण्याची शक्यता असते. केवळ विज्ञान असेल तर विनाश ओढवण्याची भीती असते. म्हणून ज्ञान-विज्ञान यांच्या जोडीला आत्मज्ञानाची जोड असेल, तर ज्ञानाला शहाणपणाची (Knowledge and Wisdom) जोड मिळेल आणि त्यातून मानवी प्रगती होईल. यासाठीच शिक्षणातून 'अंतरीची ज्ञानज्योत पेटवूया' या भावनेतूनच त्यांनी शेवटपर्यंत कार्य केलेले आढळते.

'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' अशी संतोक्ती आहे. साहेबांच्या विचारांमध्ये, उक्तीमध्ये आणि कृतीमध्ये तसूभरही अंतर असलेले दिसत नाही. वानगीदाखल सांगायचे झाले तर आपणांस स्वच्छतेचे सांगता येईल. त्यांनी कधीही 'सेल्फी'साठी, 'फोटो'साठी स्वच्छतेचा आग्रह धरला नाही तर त्यांना तो वारसा ज्या महात्मा गांधी यांनी कुष्ठरोग्यांची सेवा करून, विनोबांनी सुरगावला मैला सफाईच्या कार्यातून, साने गुरुजी आणि गाडगेबाबा यांनी फैजपूर काँग्रेसच्या वेळी स्वेच्छेने मागून घेतलेले पायखाने सफाईचे काम यातून मिळालेला होता, तो वारसा खिरोद्याच्या मातीच्या DNA मध्येच आहे, त्यांनी सक्षमपणे जोपासला.

न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी एका ठिकाणी म्हणतात, ''बाळासाहेब जर राजकारणात गेले नसते, तर फार मोठे साहित्यिक झाले असते.'' मला असे वाटते की, 'साहेब राजकारणात गेले नसते तर फार मोठे शिक्षक झाले असते.'' साहेब जरी लौकिक अर्थाने शिक्षक नसले तरी ते 'लोकशिक्षक' होते. महाराष्ट्राला खूप मोठी लोकशिक्षकांची परंपरा लाभलेली आहे. संत, समाजसुधारक, द्रष्टे राजकारणी यांनी आपापल्या परीने लोकशिक्षणाचे, समाजजागृतीचे, समाजशिक्षणाचे कार्य केलेले आहे, त्याच परंपरेतील लोकसेवक, लोकशिक्षक म्हणून बाळासाहेबांचा नामोल्लेख करणे उचित ठरेल.

तीर्थरूप बावांचे जीवन एक साधनशुचितेचा वास्तुपाठ होता. त्यांनी सदैव साध्यासोबतच साधनदेखील महत्त्वाचे मानले, हा त्यांच्यावर असलेला महात्मा गांधींच्या जीवन आणि विचारांचा प्रभाव होता. त्यांनी आम्हा भावडांना 'मंत्र्यांची मुले' म्हणून कोणत्याही प्रकारची सवलत वा फायदा घेऊ दिला नाही. आई आणि बावांचा सक्त दंडक होता की, ''घरी काम करणारे कर्मचारी यांना नावाने हाक मारू नका, त्यांना काका, मावशी, मामा अशा आदरार्थी संबोधनाने संबोधा.'' त्यांनी त्यांच्या कृतीतून, आचरणातून जीवनाचे पाठ नकळतपणे शिकविले. त्यांच्या विचारांची शिदोरी न संपणारी आणि आयुष्याला पुरून उरणारी आहे. आई जेव्हा बी. एड. करीत होती, तेव्हा ती एक सामान्य विद्यार्थिनी म्हणून राहिली. कित्येकांना तर ही महाराष्ट्राच्या एका मंत्र्याची बायको आहे, हे सुद्धा माहीत नव्हते. इतका साधेपणा, पदाचा कुठलाही बडेजाव न मिरविता सर्वसामान्यांमध्ये मिसळून त्यांच्यातीलच एक बनून जगण्याची आणि वागण्याची शिकवण त्यांनी आम्हाला दिली.

– शिरीषदादा चौधरी

सदस्य, महाराष्ट्र विधानसभा


आता ई-बुक स्वरूपातही
अथर्वची सर्व पुस्तके उपलब्ध...

- pejbook.com
- amazon.com
- Google Play Books
- atharvapublications.com




PRINCIPAL
SANE GURUJI VIDYA PRABODHINI
Comprehensive College of Educa...



अथर्व पब्लिकेशन्स्
ऑनलाईन पुस्तक खरेदीकरिता...
www.atharvapublications.com

ISBN [illegible]

₹ 150/-


कर्तृत्वाचा
महामेरु
सपादक - प्रा.डॉ. साहेबराव भुकन

ाजित व्याख्यानांचे संपादन)

13-6
७

, धुळे- ४२४ ००१.
०
नगर हौसिंग सोसायटी,
गाव- ४२५ ००१.
६४६११७१९७
@gm .com
cations.com

२०२१
फिकान्स
I

on
iarvapublications.com
apublications.com

वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी
ही प्रकारे माहिती साठवणुकीच्या
गीशिवाय करता येणार नाही. सर्व

# अ नु क्र म णि का


☛ प्रास्ताविक ........ ०५
मा. शिरीषदादा चौधरी

☛ बाळासाहेब चौधरी : एक प्रेरणास्त्रोत ........ ०७
प्रभात चौधरी

☛ 'कर्तृत्वाचा महामेरू'च्या निमित्ताने ........ ०९
प्रा. डॉ. साहेबराव भुकन

१. मा. बाळासाहेबांचे बालपण व शिक्षण ........ १३
रमेश पांडुरंग झांबरे

२. बाळासाहेबांचे जळगाव जिल्ह्याच्या विकासातील योगदान ........ २५
प्रा. वाय. व्ही.पाटील

३. लोकसेवक बाळासाहेब आणि महाराष्ट्राची जडणघडण ........ ३१
डॉ. एन. एन. लांडगे

४. मंत्री बाळासाहेब ........ ३९
प्रभात रामभाऊ चौधरी

५. बाळासाहेब : एक संस्थाचालक ........ ५५
जे. टी. ढोले

६. बाळासाहेब आणि राष्ट्रभाषा ........ ६४
प्रा. डॉ. सरस्वती राचय्या रटकले

ाव चव्हाण यांच्या मदतीने शासकीय
घातला. जळगावमध्ये उत्तर महाराष्ट्र
पीठ खानदेशात आणण्यामध्ये त्यांनी

। राजधानी; त्याचप्रमाणे राज्यातील व
ग होण्यासाठी जळगावला विमानतळ
जाणवली. त्यामुळे त्यांनी विमानतळ
|; तर मंजूरदेखील करून आणले.
. दीपनगर औष्णिक वीजनिर्मिती केंद्र
गीत पुढाकार घेऊन स्थानिक तरुणांना
बेरोजगारांच्या हाताला काम मिळवून
ार्थिक व सांकृतिक उन्नती झाली.
ाकऱ्यांनी आधुनिक व प्रगत शेतीची
न ज्ञान व प्रयोग यांची माहिती व्हावी,
ांना मिळावे, यासाठी पाल येथे जळगाव
न्द्र सुरू करून आधुनिक ज्ञान-विज्ञान
पोहोचविले.
वेक यांच्याशी निकटचा संबंध होता.
रतीय मराठी साहित्य संमेलन भरले.
राव खरात या दलित साहित्यिकाला
। यशस्वी करून दाखविले; त्याचप्रमाणे
र्शं' संमेलन यशस्वी केले.
शाहती, साखर कारखाने, सूतगिरण्या,
टेडियम अशा अनेक योजना त्यांनी
ा खऱ्या अर्थात सर्व क्षेत्रांत विकास
ष्ट्राची अर्थव्यवस्था कितीतरी पटींनी
ची उभारणी केली; पण त्यांनी स्वतःला
ही. शिक्षणाची गंगा घराघरापर्यंत नेली;
ः अनेक सहकारी संस्थांना जन्म दिला;
लोकांच्या सेवेसाठी त्यांनी हा उपद्व्याप
ही बिरुदावली सार्थ केली.

३

# लोकसेवक बाळासाहेब आणि महाराष्ट्राची जडणघडण

डॉ. एन. एन. लांडगे
साने गुरुजी विद्याप्रबोधिनी, खिरोदा

'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा जय जय महाराष्ट्र माझा' या गीतामुळे आपल्याला स्फुरण येते. महाराष्ट्राच्या निर्मितीत अनेकांच्या प्राणाचे बलिदान सामावलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाने स्वराज्य निर्माण निर्माण झाले. ते स्वराज्य म्हणजे आजचा तुमचा-माझा महाराष्ट्र होय. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील; उदाहरणार्थ – शेती, वीज, रस्ते, महामार्ग, धरणे, आधुनिकीकरण यांचा विकास साधताना अनेक सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रातील तरुण नेते व तज्ज्ञ यांनी रात्रंदिवस कष्ट आणि श्रम पणाला लावून आजचा हा महाराष्ट्र उभा केला आहे. खानदेशरत्न लोकसेवक मधुकरराव तथा बाळासाहेब चौधरी यांचा महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये मोलाचा वाटा आहे. केवळ पद, प्रतिष्ठा, मानमरातब याकडे न पाहता ते काम करीत राहिले. त्यांच्या वडिलांच्या म्हणजेच स्वर्गीय दादासाहेब चौधरी यांच्या स्वातंत्र्य आंदोलनातील गांधी प्रेरित सहभागाने, फैजपूरच्या अधिवेशनातील योगदानाने, अनेक मोठ्या नेत्यांच्या सहवासाने व सहकारी मित्रांच्या सहकार्याने झालेल्या संस्कारांनी नेमकी समाजाची नाळ व महाराष्ट्राची दशा आणि दिशा मधुकरराव ओळखून होते. पूर्ण अभ्यासानिशी जनतेने त्यांच्यावर टाकलेली जबाबदारी त्यांनी पूर्ण केली. त्यांच्याच शब्दांत सांगायचे झाले, तर चांद्यापासून बांद्यापर्यंत महाराष्ट्राच्या विकासासाठी सर्वस्व पणाला लावले.

भाऊसाहेबांच्या अतुलनीय साथीने त्यांच्यावरील प्रेमभक्तीमुळे सर्वोदय संचालक झाले. पुढे निवडणूक लढवून ते विजयी झाले. सर्व आमदारांना नेता निवडीसाठी मुंबई येथे बोलाविण्यात आले. एके दिवशी यशवंतरावांची तार बाळासाहेबांना आली व ते मुंबईला पोहोचले. बाळासाहेब हे यशवंतरावांना म्हणाले, ''तुमची तार आली म्हणून भेटायला आलो.'' त्यावर यशवंतराव म्हणाले,



... Vidya Prabo...

"मी बाळासाहेब देशमुखांना बोललो आहे. तुम्हाला मंत्रिमंडळात घ्यायचे ठरविले आहे." त्यावर मधुकरराव म्हणाले, "मी तुमचा सैनिक आहे. A soldier has not to ask why? He has to do and die." हे बाळासाहेबांच्या जीवनातील राजकीय कार्यकर्ता म्हणून बांधिलकी आहे. यावर यशवंतराव चव्हाण खूश झाले आणि म्हणाले, "म्हणून तर मी तुम्हाला माझ्या मंत्रिमंडळात उपमंत्री म्हणून घेणार आहे." वेणूबाईशी बोलताना यशवंतराव म्हणाले, "दिसायला हा बावळा असला तरी माझ्याशी भांडला आहे, म्हणूनच मी त्याला माझ्या मंत्रिमंडळात सहकारी म्हणून घेणार आहे." या संवादावरून यशवंतरावांचे मोठेपण आणि मधुकररावांची निर्भीडता, वैचारिकता, प्रामाणिक कार्यकर्ता हे गुण स्पष्ट होतात. त्यांच्या गुणांमुळेच यशवंतरावांना असे वाटले असावे की, उद्याचा महाराष्ट्र यांच्यासारख्या तरुणांच्या हाती सुरक्षित राहील, तसेच घडले.

मुंबई मंत्रिमंडळ निर्मितीचा गोंधळ सुरु होता. तेवढ्यात मधुकररावांचे तथा बाळासाहेबांचे नाव शपथविधीसाठी उच्चारले. राज्यपाल श्रीप्रकाश यांनी शपथ देवविली. बाळासाहेब वयाच्या २८ व्या वर्षी उपमंत्री बनले. खिरोदा गावाचा सुपुत्र मुंबई राज्याचा उपमंत्री बनला. याचे तत्कालीन वास्तव वर्णन कविवर्य भानू सरांनी त्यांच्या कवितेत फार सुंदर केले आहे -

*शेतकरी बंधू माझा, शेतकऱ्यांचा कैवारी*
*मुंबईले जाईसन देशावर राज करी...*

अशाप्रकारे महाराष्ट्रातील राजकीय कारकिर्दीचा 'श्रीगणेशा' झाला. यशवंतरावांच्या परिसस्पर्शाने तेजोमयी झालेल्या या प्रकाशाने महाराष्ट्रातील विकासाची कामे करण्यासाठीचा मार्ग त्यांच्याकरवी खुला झाला आणि बाळासाहेबांच्या कर्तृत्वाने महाराष्ट्रात अनेक क्षेत्रांतील मंत्रिपदाच्या कार्यभारासह विविध विभागांत नेत्रदीपक विकास झाला. महाराष्ट्राच्या जडणघडणीत मधुकररावांच्या या कामगिरीने मोठा बदल तर झालाच; पण त्याचबरोबर त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा स्पर्श व त्यांच्याकडील जबाबदारीच्या क्षेत्राचे सोने करून गेला. जसे परिसस्पर्शाने लोखंडाचे सोने व्हावे अगदी तसेच.

**वीज, पाणी, रस्तेनिर्मितीस गती देण्यास पुढाकार**

महाराष्ट्रात वीज, पाणी, रस्तेनिर्मितीस गती देणारे मधुकरराव चौधरी होते. मधुकरराव प्रथमच सिंचन आणि ऊर्जा खात्याचे उपमंत्री म्हणून काम पाहू लागले. या विभागाचे कॅबिनेट मंत्री बाळासाहेब देसाई होते. या विभागात काम करताना कामाशिवाय बसणे त्यांना आवडेना. तशी खंत त्यांनी व्यक्त केली. त्यानंतर त्यांच्याकडे फाइल्स आल्या आणि अतिशय महत्त्वाचा प्रश्न हाताळला, तो म्हणजे तापी नदीच्या पाणीवाटपाचा. अगोदर तयार असलेला प्रस्ताव त्यांनी अभ्यासला.



महाराष्ट्रातील ज्या चार नद्यांच्य
म्हणजे तापी होय. या प्रस्तावात
त्यांनी पाणीवाटपाची नवीन योज
टक्के पाणी महाराष्ट्राला मिळाले.
त्यामुळे आज जळगाव जिल्हा सं
औष्णिक ऊर्जा, पिण्याच्या पाण
कष्ट घेतले, अभ्यास केला. पूर्व
डिझेल इंजिनद्वारे विहिरीतून पा
त्यामुळे शेतकऱ्यांना खूप ताण
ठिकाणी वीजनिर्मिती केंद्राला मधु
विहिरींवर वीजपंप चालू लागले
वाढले आणि एकप्रकारे महाराष्ट्रा
उत्पादनास गती मिळाली.

याच काळात महाराष्ट्रातील
सुरु झाली. जवळजवळ छोटे-मं
या काळात दुसरा एक प्रश्न मधुक
निर्मितीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न
मधुकररावांनी केले. महाराष्ट्र सर
समिती स्थापन केलेली होती. या
परस्पर असहकारामुळे कामात
मधुकररावांनी केले. त्यामुळे महा

सिंचन खात्यामधील आण
पाटकरी यांच्यातील वादाचा प्रश
ही संकल्पना त्यांनी राबविली.
संपुष्टात आला. टोकावरच्या शे
मित्र त्यांना मिळाले. धुळे-जळग
जिल्ह्याचे नकाशे तयार केले व
धरणे यांचे नियोजन केले. धुळे-
रक्कम पाहून त्यांनी घेतलेला निर्ण
त्या वेळी सातारा, सांगली, कोल
रुपये आणि जळगाव व धुळे जि
कशासाठी? हे मुख्यमंत्र्यांकडे म
जिल्ह्यातील लोकांसाठी पणाला

ञे आहे. तुम्हाला मंत्रिमंडळात घ्यायचे ठरविले
;, ''मी तुमचा सैनिक आहे. A soldier has
o and die.'' हे बाळासाहेबांच्या जीवनातील
की आहे. यावर यशवंतराव चव्हाण खुश झाले
तुम्हाला माझ्या मंत्रिमंडळात उपमंत्री म्हणून
ा यशवंतराव म्हणाले, ''दिसायला हा बावळा
ाहे, म्हणूनच मी त्याला माझ्या मंत्रिमंडळात
ा संवादावरून यशवंतरावांचे मोठेपण आणि
ता, प्र... णिक कार्यकर्ता हे गुण स्पष्ट होतात.
। असे वाटले असावे की, उद्याचा महाराष्ट्र
रक्षित राहील, तसेच घडले.
ोंधळ सुरू होता, तेवढ्यात मधुकररावांचे तथा
ठी उच्चारले. राज्यपाल श्रीप्रकाश यांनी शपथ
१८ व्या वर्षी उपमंत्री बनले. खिरोदा गावाचा
ा. याचे तत्कालीन वास्तव वर्णन कविवर्य भानू
: केले आहे -

*माझा, शेतकऱ्यांचा कैवारी*
*सेन देशावर राज करी...*

राजकीय कारकिर्दीचा 'श्रीगणेशा' झाला.
ोमधी झालेल्या या प्रकाशाने महाराष्ट्रातील
ा मार्ग त्यांच्याकरवी खुला झाला आणि
ट्रात अनेक क्षेत्रांतील मंत्रिपदाच्या कार्यभारासह
वेकास चाला. महाराष्ट्राच्या जडणघडणीत
ऱ्या वद...ार झालाच; पण त्याचबरोबर त्यांच्या
व त्यांच्याकडील जबाबदारीच्या क्षेत्राचे सोने
ोखंडाचे सोने व्हावे अगदी तसेच.

गती देण्यास पुढाकार

तेनिर्मितीस गती देणारे मधुकरराव चौधरी होते.
ऊर्जा खात्याचे उपमंत्री म्हणून काम पाहू लागले.
साहेब देसाई होते. या विभागात काम करताना
ेना. तशी खंत त्यांनी व्यक्त केली. त्यानंतर
। अतिशय महत्त्वाचा प्रश्न हाताळला, तो म्हणजे
ोदर तयार असलेला प्रस्ताव त्यांनी अभ्यासला.

महाराष्ट्रातील ज्या चार नद्यांच्या पाणीवाटपाचा प्रश्न होता, त्यांपैकी एक नदी म्हणजे तापी होय. या प्रस्तावात महाराष्ट्राचा विचार करता अन्यायकारक आहे. त्यांनी पाणीवाटपाची नवीन योजना तयार केली, ती मंजूर झाली. त्यामुळे ६६ टक्के पाणी महाराष्ट्राला मिळाले. प्रस्तावानुसार हतनूर येथे मोठे धरण बांधले. त्यामुळे आज जळगाव जिल्हा संपन्न झाला आहे. आयुधनिर्माणी, रेल्वे, दीपनगर, औष्णिक ऊर्जा, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न त्यामुळे सुटला. मधुकररावांनी खूप कष्ट घेतले, अभ्यास केला. पूर्ण महाराष्ट्रात यादरम्यान मोट अथवा किर्लोस्कर डिझेल इंजिनद्वारे विहिरीतून पाणी उपसून शेताला पाणी पुरविले जात होते. त्यामुळे शेतकऱ्यांना खूप ताण सहन करावा लागत होता. भुसावळसारख्या ठिकाणी वीजनिर्मिती केंद्राला मधुकररावांमुळेच चालना मिळाली आणि मोटऐवजी विहिरींवर वीजपंप चालू लागले. त्यामुळे शेतकऱ्यांचे कष्ट कमी झाले, उत्पन्न वाढले आणि एकप्रकारे महाराष्ट्रातील शेतकरी राजाला सुख मिळाले आणि शेती उत्पादनास गती मिळाली.

याच काळात महाराष्ट्रातील पहिली उपजलसिंचन योजना त्यांच्या प्रयत्नाने सुरू झाली. जवळजवळ छोटे-मोठे बंधारे, धरणे मिळून ३५ प्रकल्प पूर्ण झाले. या काळात दुसरा एक प्रश्न मधुकररावांनी हाताळला, तो प्रश्न म्हणजे जलविद्युत निर्मितीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न. या प्रकल्पाला गती प्राप्त करून देण्याचे काम मधुकररावांनी केले. महाराष्ट्र सरकारने या कामासाठी मंत्री व तंत्रज्ञ यांची एक समिती स्थापन केलेली होती. या समितीमधील अर्थमंत्री व सिंचनमंत्री यांच्यातील परस्पर असहकारामुळे कामात गती नव्हती. यांच्यात दुवा साधण्याचे काम मधुकररावांनी केले. त्यामुळे महाराष्ट्रातील या भव्य प्रकल्पला गती प्राप्त झाली.

सिंचन खात्यामधील आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे शेतकरी व पाटकरी यांच्यातील वादाचा प्रश्न. हा प्रश्न सोडविण्यासाठी 'इरिगेशन दरबार' ही संकल्पना त्यांनी राबविली. त्यामुळे अधिकारी व शेतकरी यांच्यातील वाद संपुष्टात आला. टोकावरच्या शेतापर्यंत पाणी पोहोचू लागले. त्यामुळे अनेक मित्र त्यांना मिळाले. धुळे-जळगाव जिल्ह्यांचे पालकमंत्री असताना महाराष्ट्रातील जिल्ह्याचे नकाशे तयार केले व जिल्ह्यातील महामार्ग, राज्यमार्ग, रस्ते, पूल, धरणे यांचे नियोजन केले. धुळे-जळगाव जिल्ह्यांच्या विकासासाठी मिळालेली रक्कम पाहून त्यांनी घेतलेला निर्णय महाराष्ट्राला समानतेचा संदेश देणारा ठरला. त्या वेळी सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांसाठी प्रत्येकी ८०-९० लाख रुपये आणि जळगाव व धुळे जिल्ह्यांसाठी १०-१५ लाख रुपये ही असमानता कशासाठी? हे मुख्यमंत्र्यांकडे मांडले. त्यांनी आपले मंत्रिपद महाराष्ट्रातील या जिल्ह्यातील लोकांसाठी पणाला लावले.

भोकर नदीच्या पुलाचे काम करून वाहतुकीतील अडथळे असणारे रस्ते, नवीन रस्त्यांची आवश्यकता हे केवळ अभ्यासूवृत्ती असणाराच करू शकतो. पालकमंत्री असावा तर असा, या शब्दांत बाळासाहेब देसाईंनी त्यांचा गौरव केला. हे सर्व करताना महाराष्ट्रातील माझा शेतकरी, त्यांचा विकास, महाराष्ट्राचा विकास, हेच तत्त्व मधुकररावांच्या कार्यात पाहायला मिळते.

पालकमंत्र्यांचा कार्यभार सांभाळताना उत्कृष्ट पालकमंत्री म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. या वेळीसुद्धा त्यांनी एक नवीन संकल्पना राबविली. त्यामुळे महाराष्ट्रात नवीन नेतृत्वे निर्माण झाली. महाराष्ट्राच्या विकासात लोकसहभाग वाढला. स्थानिक विकासनिधीमधून जमा होणाऱ्या योगदानाने १०० रुपयांत १३३ रुपयांचे काम होऊ लागले. महाराष्ट्रातील नगरविकास विभाग मिळाल्यानंतर भविष्यातील गरज लक्षात घेऊन बॉम्बे मेट्रो पोलिशेन रिजनल डेव्हलपमेंट ॲथॉरिटीची स्थापना केली. सहकारमध्ये असताना महाराष्ट्रातील साखर कारखाने निर्मितीस प्रोत्साहन दिले. मधुकर सहकारी साखर कारखाना त्या वेळी मान्यतेची अट पूर्ण करणारा पहिला कारखाना. या वेळी असे ठरले होते की, जो कारखाना लवकर भागभांडवल तयार करेल, त्याला अगोदर मान्यता दिली जाईल. त्याप्रमाणे या ठिकाणचे अनेक कार्यकर्ते एकत्र आले आणि मधुकररावांच्या प्रेरणेने चाळीस हजारांचे भागभांडवल अल्पावधीतच जमा केले. एवढ्यावर ते थांबले नाहीत, तर महाराष्ट्रातील शेतकरी सुखी राहावा यासाठी अतिवृष्टी, महापूर, भूकंप यांसारख्या आपत्तींमध्ये शेतकऱ्यांचे होणारे नुकसान भरून निघण्यासाठी स्थानिक निधीचा उपयोग करावा, असे मधुकररावांनी सुचविले.

संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर पडीक जमीन दलितांना व मागासवर्गीयांना द्यावी, अशी मागणी होऊ लागली. त्या वेळी या मागणीला मुख्यमंत्र्यांनी पाठिंबा दिला. नाईक साहेब आजारी असल्याने जमीनवाटपाची जबाबदारी मधुकररावांवर सोपविली. त्यांनी महाराष्ट्रातील जमिनीचा आढावा घेतला, मसूदा तयार केला व मुंबईला पाठविला, तो मान्य झाला. जमीनवाटप (सातबारा) पहिला कार्यक्रम नेवासा येथे झाला. सामान्य जनतेच्या सुख-दुःखाशी संवेदनशील असल्यानेच महाराष्ट्रातील जनतेला समानतेचा संदेश दिला. आदिवासी समाजाचा विकास करणे हे त्यांच्या कार्यांचा एक भागच होता. सामाजिक समतेच्या विकासाचा हा एक मोलाचा मार्ग त्यांनी महाराष्ट्राला दिला. १९७० मध्ये सामाजिक समता परिषद स्थापन केली. १९५३ मध्ये सातपुडा विकास मंडळाची स्थापना केली. आदिवासी बांधव शिकले.

मधुकररावांच्या जीवनाशी धर्मनिरपेक्षतेमुळे महाराष्ट्राच्या विकासात त्यांना वजा करता येत नाही, हेच खरे. मुंबईला मंत्रालय आवास मलबार हिल येथे



राहत असताना सर्व मंत्र्यांचे ये
विकासात हे एक पारिवारिक
थोडक्यात, चॅरिटी बीगीन ॲ
महाराष्ट्राला यातून मिळाला.
जीवन निर्माण करण्याचा मा
असे ते मानीत. त्यामुळे महा

**मागासवर्गीयांसाठी सव**

महाराष्ट्रातील मागासव
मधुकररावांची होती. मधुक
तयार करण्याची जबाबदारी
आढावा घेतला. जमीन धारणे
अर्धबागायती २२ एकर आणि
तसेच कारखान्याकडील जमि
महाराष्ट्राच्या जनतेसाठीचा क
शकतात. आदिवासी व मा
मंत्रिपद पणाला लावले. सव
ज्या मागासवर्गीयांनी बौद्धध
सुरू कराव्यात, अशी मागणी
विरोध न करणारे फक्त चा
मागासवर्गीयांच्या विकासास
होते. पुढे सर्व मंत्रिमंडळाने

**आरोग्यसेवेच्या विका**

महाराष्ट्रातील आरोग्य
प्रयत्न केले. १९६९ मध्ये
१९५४ मध्ये पूर्व खानदेश
महामारीमध्ये आपण आरोग्य
विचार करता, आरोग्यविषयक
पाहताना मधुकररावांनी तत्का
घेतला. मुळातच त्यांचा स्व
आरोग्य मंत्रालयाची जबाब
त्यांनी महाराष्ट्रातील आरोग्य
एखाद्याला त्याचे कर्तव्य आ
एक भाग म्हटले तर वावगे

न वाहतुकीतील अडथळे असणारे रस्ते,
: अभ्यासूवृत्ती असणाराच करू शकतो.
व्दांत बाळासाहेब देसाईंनी त्यांचा गौरव
ज्ञा शेतकरी, त्यांचा विकास, महाराष्ट्राचा
र्शत पाहायला मिळते.

ाना उत्कृष्ट पालकमंत्री म्हणून त्यांच्याकडे
एक नवीन संकल्पना राबविली. त्यामुळे
. मह[illegible]ाच्या विकासात लोकसहभाग
ामा होणाऱ्या योगदानाने १०० रुपयांत
ष्ट्रातील नगरविकास विभाग मिळाल्यानंतर
थे मेट्रो पोलिशेन रिजनल डेव्हलपमेंट
 असताना महाराष्ट्रातील साखर कारखाने
री साखर कारखाना त्या वेळी मान्यतेची
वेळी असे ठरले होते की, जो कारखाना
 अगोदर मान्यता दिली जाईल. त्याप्रमाणे
ने आणि मधुकररावांच्या प्रेरणेने चाळीस
ा केले. एवढ्यावर ते थांबले नाहीत, तर
ठी अतिवृष्टी, महापूर, भूकंप यांसारख्या
 भरून निघण्यासाठी स्थानिक निधीचा
विले.

क जमीन दलितांना व मागासवर्गीयांना
वेळी या मागणीला मुख्यमंत्र्यांनी पाठिंबा
मीनवाटपाची जबाबदारी मधुकररावांवर
ा आढावा घेतला, मसुदा तयार केला व
मीनवाटप (सातबारा) पहिला कार्यक्रम
ुख-दुःखाशी संवेदनशील असल्यानेच
 दिला. आदिवासी समाजाचा विकास
होता. सामाजिक समतेच्या विकासाचा
 दिला. १९७० मध्ये सामाजिक समता
पुडा विकास मंडळाची स्थापना केली.

क्षतेमुळे महाराष्ट्राच्या विकासात त्यांना
ा मंत्रालय आवास मलबार हिल येथे

राहत असताना सर्व मंत्र्यांचे येणे-जाणे त्यांच्या घरी असे. त्यामुळे महाराष्ट्राच्या विकासात हे एक पारिवारिक संबंध स्थापन करणारे घर, हेच केंद्र ठरले होते. थोडक्यात, चॅरिटी बीगीन अॅट होम. 'वसुधैव कुटुम्बकम्' हा एक संदेश संपूर्ण महाराष्ट्राला यातून मिळाला. त्यांनी तयार केलेली सप्तपदी जणू याच धर्मनिरपेक्ष जीवन निर्माण करण्याचा मार्ग त्यांनी दिला. सत्ता हे लोकसेवेचे साधन आहे, असे ते मानीत. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नवचैतन्य निर्माण झाले.

**मागासवर्गीयांसाठी सवलती देण्याची भूमिका**

महाराष्ट्रातील मागासवर्गीयांसाठी सवलती देण्यात महत्वाची भूमिका मधुकररावांची होती. मधुकररावांवर कमाल जमीन धारणा कायद्याचे प्रारूप तयार करण्याची जबाबदारी आली. संपूर्ण महाराष्ट्रातील जमिनीचा त्यांनी आढावा घेतला. जमीन धारणेच्या मर्यादा निश्चित केल्या. बागायती १६ एकर, अर्धबागायती २२ एकर आणि कोरडवाहू ४८ एकर. यावरची जमीन काढून घेणे, तसेच कारखान्याकडील जमीन काढणे, हे सर्व समान असावे. यासाठी त्यांचा महाराष्ट्राच्या जनतेसाठीचा कळवळा दिसून येतो. हे केवळ मधुकरराव हेच करू शकतात. आदिवासी व मागासवर्गीयांच्या सवलतींबाबतसुद्धा त्यांनी आपले मंत्रिपद पणाला लावले. सवलती बंद करणे या दिशेने विचार सुरू असतानाच ज्या मागासवर्गीयांनी बौद्धधर्म स्वीकारला, त्या मागासवर्गीयांच्या सवलती परत सुरू कराव्यात, अशी मागणी होऊ लागली. त्या वेळी मंत्रिमंडळात या प्रस्तावाला विरोध न करणारे फक्त चार मंत्री होते. त्यात बाळासाहेब होते. महाराष्ट्रातील मागासवर्गीयांच्या विकासासाठी सामाजिक जाणिवेने काम करणारे बाळासाहेब होते. पुढे सर्व मंत्रिमंडळाने सवलती सुरू ठेवण्यावर शिक्कामोर्तब केले.

**आरोग्यसेवेच्या विकासात मधुकररावांची भूमिका**

महाराष्ट्रातील आरोग्यविषयक कार्याला मजबुती देण्यासाठी मधुकररावांनी प्रयत्न केले. १९६९ मध्ये मुंबई येथे पहिले सहकारी रुग्णालय निर्माण केले. १९५४ मध्ये पूर्व खानदेश सेवा मंडळ स्थापन केले. आज कोविड-१९ च्या महामारीमध्ये आपण आरोग्यविषयक सामान्य माणसांच्या गरजा, परिस्थिती याचा विचार करता, आरोग्यविषयक सुविधा, त्रुटी यांची कल्पना येते. या विभागाचे काम पाहताना मधुकररावांनी तत्कालीन महाराष्ट्रातील आरोग्यविषयक सुविधांचा आढावा घेतला. मुळातच त्यांचा स्वभाव व विचारांची तात्त्विक बैठक पक्की असल्याने आरोग्य मंत्रालयाची जबाबदारी जेव्हा त्यांच्यावर आली, तेव्हा कर्तव्य म्हणून त्यांनी महाराष्ट्रातील आरोग्य केंद्रांना भेटी देऊन विभागाची पूर्ण माहिती मिळविली. एखाद्याला त्याचे कर्तव्य आणि चूक लक्षात आणून देणे, हा त्याचा शिस्तीचाच एक भाग म्हटले तर वावगे ठरणार नाही; पण मुद्दाम कुणाचा अपमान करणे,

हा त्यांचा हेतू कधीच नसे. त्या वेळी आरोग्य खात्याचे सचिव राजवाडे होते. त्यांच्या ठायी अहंकार, ताठरपणा होता. ही त्यांची ख्याती होती. मधुकररावांनी त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली. जसे अर्जुन कर्तव्यापासून दूर होत असताना श्रीकृष्णाने त्याचे कर्तव्य समजावले, तसे मधुकररावांनी राजवाडे यांना सुचविले. पुढे राजवाडे अगदीच थंड झाले. मधुकररावांनी तत्कालीन सर्व जिल्हा रुग्णालयांना भेटी दिल्या. आरोग्यसेवेचा दर्जा लक्षात घेतला आणि रुग्णालयांचा दर्जा निश्चित केला. जणू ही आरोग्यसेवेची परीक्षाच होती. दर्जा राखण्यासाठी एक कार्यक्रम राबविला. खाजगी वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना केली. आज खानदेशातील नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रातील अनेक तरुण-तरुणी त्या काळात शिकून आज जगात काम करीत आहेत. महाराष्ट्रात सरकार आणि वैद्यकीय क्षेत्र यामध्ये परस्पर विश्वास निर्माण करण्याचे काम मधुकररावांनी केले. त्यामुळे महाराष्ट्रातील आरोग्यसेवेच्या विकासास चालना मिळाली.

अन्न व औषधी प्रशासन विभागात होणारा हस्तक्षेप टाळण्यासाठी त्यांनी या विभागाला स्वायत्तता दिली. भारतीय उपचारपद्धतीला प्रोत्साहन दिले, शिस्त निर्माण केली. औषधी, उपचार योग्य प्रकारे पोहोचविण्यासाठी भ्रष्टाचार करणाऱ्याला त्यांनी त्यांची जागा दाखविली. जे योग्य ते योग्य, असा मधुकररावांचा पिंड होता. डॉ. दास यांनी भ्रष्टाचार केला म्हणून त्यांचे निलंबन केले. त्यामुळे मधुकररावांचा महाराष्ट्रामध्ये एकप्रकारचा धाक निर्माण झाला.

**सांस्कृतिक क्षेत्रातील प्रगतीत मधुकररावांचे योगदान**

मधुकररावांचा पिंडच होता उपक्रमशीलता. सांस्कृतिक आणि कला क्षेत्रातील महत्त्वपूर्ण परिवर्तनाची नांदी त्यांनी रचली. मला मधुकररावांच्या कार्यभूमीत काम करायला मिळाले, हे माझे संचित समजतो. १५ ऑगस्ट १९९४ रोजी मी बी. एड्. महाविद्यालयात व्याख्यातापदावर रुजू झालो. तत्कालीन प्राचार्यांनी मला १५ ऑगस्टनिमित्त सकाळी पांढरेशुभ्र कपडे घालून (युनिफॉर्म) आजच्या हुतात्मा चौकात येण्यास सांगितले. त्या वेळची प्रभातफेरी माझ्या कायम आठवणीत राहिली. प्रभातफेरीमध्ये सहभागी झालेले गावकरी, जशी प्रभातफेरी गावातून पुढे-पुढे सरकत होती, तसे गावकरी त्यामध्ये सहभागी होत होते. हे सांगण्याचे कारण एवढेच की, सांस्कृतिक कला अथवा शिस्त ही त्यांच्या रोमारोमात भिनलेली होती.

जळगाव येथील १९८४ चे मराठी साहित्य संमेलन अगदी जाती-धर्म-पंथापलीकडचे होते. या वेळी दिवंगत महादेवी वर्मा यांच्या भाषणातील हे वाक्य 'मेराभाई मधुकरराव चौधरी इनका प्यार मुझे यहाँ लाया!' एखादी बाहेरची व्यक्ती एखाद्या मंत्र्याला नात्याने भाऊ म्हणून संबोधणे, हे फारच क्वचित पाहावयास



मिळते. माणसे जोडणे, माणस
त्यामुळेच महाराष्ट्रात अनेक
दिसतात. भारत जोडो आं
झाले. समता, एकात्मता, क
सादरीकरणातून महाराष्ट्राच्या
नाही.

महाराष्ट्रातील कलेची
नैसर्गिक कलागुणांचाच भाग
चित्रपटनिर्मितीच्या बाबतीत म
येथे चित्रनगरी उभारण्याला च
अनेक सुविधा-सवलती जाही
निवड झाली. आर्थिक अडचण
निर्माते व दिग्दर्शक यांना बोल
एकासंदर्भात त्याबद्दल कृतज्ञता
त्यांनी राबविला. त्यांनी मंत्रिप
नसून उभारण्यासाठी आहेत, 

**वनविकास, पर्यावरण**

वन आणि पर्यावरण या
संवर्धन व विकासात महाराष्ट्रा
विभाग सांभाळत असताना
विकासात्मक जडणघडणीमध्ये
केला. महाराष्ट्र वनविकास मं
त्यांना जंगलाची आवड होती.
करून अभ्यास केला आणि चं
भंडारा जिल्ह्यात साग लागवडी
अनेक ठिकाणी महाराष्ट्रात वन
देणे आवश्यक असल्याने चंद्र
स्थापन केली. रेस्ट हाउसची स्थ
झाला. ये-जा करण्याचा त्यांचा
धूप थोपविण्यासाठी काठावर
केला, तर वनकर्मचारी अधि
बाळासाहेबांची महाराष्ट्रातील
विचार आहे.

ारोग्य खात्याचे सचिव राजवाडे होते.
ही त्यांची ख्याती होती. मधुकररावांनी
देली. जसे अर्जुन कर्तव्यापासून दूर होत
ाले, तसे मधुकररावांनी राजवाडे यांना
. मधुकररावांनी तत्कालीन सर्व जिल्हा
दर्जा लक्षात घेतला आणि रुग्णालयांचा
ची परीक्षाच होती. दर्जा राखण्यासाठी
महा लयाची स्थापना केली. आज
ील अनेक तरुण-तरुणी त्या काळात
. महाराष्ट्रात सरकार आणि वैद्यकीय
ाचे काम मधुकररावांनी केले. त्यामुळे
ालना मिळाली.

होणारा हस्तक्षेप टाळण्यासाठी त्यांनी
ीय उपचारपद्धतीला प्रोत्साहन दिले,
ग्य प्रकारे पोहोचविण्यासाठी भ्रष्टाचार
. जे योग्य ते योग्य, असा मधुकररावांचा
म्हणून त्यांचे निलंबन केले. त्यामुळे
धाक निर्माण झाला.

**करावांचे योगदान**

मशीलता, सांस्कृतिक आणि कला
त्यांनी रचली. मला मधुकररावांच्या
हे सं समजतो. १५ ऑगस्ट १९९४
िक्षणाधिपदावर रुजू झालो. तत्कालीन
ळी पांढरेशुभ्र कपडे घालून (युनिफॉर्म)
े. त्या वेळची प्रभातफेरी माझ्या कायम
ागी झालेले गावकरी, जशी प्रभातफेरी
ावकरी त्यामध्ये सहभागी होत होते.
तिक कला अथवा शिस्त ही त्यांच्या

साहित्य संमेलन अगदी जाती-धर्म-
ादेवी वर्मा यांच्या भाषणातील हे वाक्य
े यहाँ लाया!' एखादी बाहेरची व्यक्ती
ंबोधणे, हे फारच क्वचित पाहावयास

मिळते. माणसे जोडणे, माणसांची मने जोडणे हे मधुकररावांचे कौशल्यच होय. त्यामुळेच महाराष्ट्रात अनेक कार्यकर्ते काहीही सहकार्य करण्यास सज्ज झालेले दिसतात. भारत जोडो आंदोलनात क्रांतिसिंहांबरोबर मधुकरराव सहभागी झाले. समता, एकात्मता, कर्तव्यतत्परता आणि कृतिप्रवणता हे त्यांच्या वर्तन सादरीकरणातून महाराष्ट्राच्या तत्कालीन विकासात पाझरल्यावाचून राहू शकले नाही.

महाराष्ट्रातील कलेची जोपासना करणे, विकास करणे हे त्यांच्या नैसर्गिक कलागुणांचाच भाग होता. रामटेक येथे कालिदासांचे स्मारक उभारले. चित्रपटनिर्मितीच्या बाबतीत महाराष्ट्रात फारशा सुविधा नव्हत्या. त्यासाठी गोरेगाव येथे चित्रनगरी उभारण्याला चालना दिली. मधुकररावांनी मराठी चित्रपटांसाठी अनेक सुविधा-सवलती जाहीर केल्या. 'सामना'ची परदेशी चित्रपट महोत्सवात निवड झाली. आर्थिक अडचण असल्याने महोत्सवात जात नसल्याचे कळल्यानंतर निर्माते व दिग्दर्शक यांना बोलावून मदत केली. दिग्दर्शक रामदास फुटाणे यांनी एकासंदर्भात त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. 'एक सूर- एक ताल' हा कार्यक्रम त्यांनी राबविला. त्यांनी मंत्रिपद कधीही मिरविले नाही. हे हात उगारण्यासाठी नसून उभारण्यासाठी आहेत, असे ते मानीत.

**वनविकास, पर्यावरण संवर्धनास मधुकररावांनी चालना दिली**

वन आणि पर्यावरण यासंबंधाने महाराष्ट्राच्या भौगोलिक व पर्यावरणात्मक संवर्धन व विकासात महाराष्ट्रातील मधुकररावांचे योगदान विशेष आहे. शिक्षण विभाग सांभाळत असताना त्यांना वनविभाग मिळाला होता. महाराष्ट्राच्या विकासात्मक जडणघडणीमध्ये त्यांनी मिळालेल्या संधीचा नेहमीच सदुपयोग केला. महाराष्ट्र वनविकास मंडळाची त्यांनी स्थापना केली. लहानपणापासूनच त्यांना जंगलाची आवड होती. त्यांनी हा विभाग मिळाल्याबरोबर नेहमीप्रमाणे दौरे करून अभ्यास केला आणि चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यांतील वनांचे नियोजन केले. भंडारा जिल्ह्यात साग लागवडीचा उपक्रम राबविला. या मंडळाच्या माध्यमातून अनेक ठिकाणी महाराष्ट्रात वनीकरणाची कामे केली. वनकर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक असल्याने चंद्रपूर, जालना, शहापूर, पाल येथे वनप्रशिक्षण केंद्रे स्थापन केली. रेस्ट हाउसची स्थापना केली. त्यामुळे अधिकाऱ्यांना त्याचा उपयोग झाला. ये-जा करण्याचा त्यांचा त्रास वाचला. पावसामुळे, पुरामुळे नदीकिनाऱ्याची धूप थोपविण्यासाठी काठावर वृक्षारोपण केले. आज आपण या गोष्टीचा विचार केला, तर वनकर्मचारी अधिकारी, पुरुष, महिला यांच्या सुविधांच्या मुळाशी बाळासाहेबांची महाराष्ट्रातील सामान्यतल्या सामान्य माणसाच्या लहान गरजेचा विचार आहे.

**सारांश**

महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये त्यांचा वाटा विशेष आहे. बाळासाहेबांचे वाक्‌चातुर्य विलक्षण होते. त्यांचा शेती उत्पादन व शेतकरी जीवनाशी घनिष्ठ संबंध असल्याने केळी पावडर करण्याचा आधुनिक विचार त्या वेळी मांडला. महाराष्ट्रातील जनतेच्या गरजा पूर्ण करणे, विकासाला चालना देणे, म्हणूनच की काय १९७७ मध्ये एका दिवसात तीन धरणांचे उद्‌घाटन करणारे मधुकरराव चौधरी हे एकमेव नेते होते. दूध संघ स्थापन केला आणि जळगाव जिल्ह्यात शेती उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी जोडधंदा निर्माण केला. सूतगिरणींची निर्मिती केली आणि जिल्ह्याच्या विकासास चालना दिली. कोणत्याही गोष्टींची सुरुवात स्वतःपासून, घरापासून करणे, हे त्यांचे तत्त्व विशेष महत्त्वाचे ठरते.


शिक्षणमंत्री म्हणून काम करताना मधुकररावांच्या वैचारिक व मूलभूत जडणघडणीमुळे महाराष्ट्रातील शिक्षणाला त्यांनी नवी दिशा देऊन एक शैक्षणिक क्रांतीच घडवून आणली. १०+२+३ हा शैक्षणिक आकृतिबंध त्यांच्याच काळात निर्माण झाला. शिक्षकांसाठी तर निवृत्तिवेतन आणि बँकेद्वारे पगार व्हावेत यासाठी त्यांनी केलेले कार्य म्हणजे शिक्षकांवरील उपकारच मानता येतील. त्यामुळे शिक्षक बिनधास्त आपले कर्तव्य पार पाडू लागला.

आपण जेव्हा त्यांच्याकडे पाहतो, अनुभवतो, तेव्हा हिरव्यागार बांबूच्या बेटासारखे सरळ, पण नम्रपणे झुकलेले शिस्तबद्ध अशा प्रकारचे त्यांचे वर्तन, शांत, नम्र, तल्लीनता, चिंतनशीलता आणि संवेदनशीलता यांनी निर्माण झालेले अनुभवास येते. त्यानिमित्ताने माझ्या त्यांच्याबद्दलच्या काही पंक्ती खाली व्यक्त करतो –

*सरळसोट उभा ताठ*
*दाटदाटीतून काढी तो वाट*
*वाकून जवळ घेई सर्वांना झाकून*
*तरी सरळसोट उभा ताट ।*
*काटेरी बाभुळी उभ्या मध्ये ताठ*
*सोडून मोकळे काटेरी केस*
*करती इजा त्याच्या सर्वांगास*
*तरी सरळसोट उभा ताट ।।*



PRINCIPAL
SANE GURUJI VIDYA PRABODHINI
Comprehensive College of Education
KHIRODA Tal.Raver, Dist. Jalgaon


कर्तृत्वाचा
महामेरु
सपादक - प्रा.डॉ. साहेबराव भुकन

अथर्व पब्लिकेशन्स

कर्तृत्वाचा महामेरू
(कै. मधुकरराव चौधरी स्मृती व्याख्यानमाला आयोजित व्याख्यानांचे संपादन)

© सर्व हक्क सुरक्षित

ISBN : 978-93-91712-13-6
पुस्तक प्रकाशन क्र. ८२७

प्रकाशक व मुद्रक
युवराज भट् माळी

अथर्व पब्लिकेशन्स
धुळे : १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे- ४२४ ००१.
संपर्क : ९४०५२०६२३०
जळगाव : शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,
तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव- ४२५ ००१.
संपर्क : ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
ई-मेल : atharvapublications@gmail.com
वेबसाइट : www.atharvapublications.com

प्रथमावृत्ती : १५ ऑगस्ट २०२१
अक्षरजुळवणी : अथर्व पब्लिकेशन्स

मूल्य : १५०/- रुपये

E-Book *available on*
amazon.in ▪ GooglePlayBooks ▪ atharvapublications.com
ऑनलाइन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.



## अनुक्रमणिका

- प्रास्ताविक ........ ०५
  मा. शिरीषदादा चौधरी
- बाळासाहेब चौधरी : एक प्रेरणास्त्रोत ........ ०७
  प्रभात चौधरी
- 'कर्तृत्वाचा महामेरू'च्या निमित्ताने ........ ०९
  प्रा. डॉ. साहेबराव भुकन

१. मा. बाळासाहेबांचे बालपण व शिक्षण ........ १३
   रमेश पांडुरंग झांबरे
२. बाळासाहेबांचे जळगाव जिल्ह्याच्या विकासातील योगदान ........ २५
   प्रा. वाय. व्ही.पाटील
३. लोकसेवक बाळासाहेब आणि महाराष्ट्राची जडणघडण ........ ३१
   डॉ. एन. एन. लांडगे
४. मंत्री बाळासाहेब ........ ३९
   प्रभात रामभाऊ चौधरी
५. बाळासाहेब : एक संस्थाचालक ........ ५५
   जे. जी. ढोले
६. बाळासाहेब आणि राष्ट्रभाषा ........ ६४
   प्रा. डॉ. सरस्वती राचय्या रटकळे

## ६

# बाळासाहेब आणि राष्ट्रभाषा

**प्रा. डॉ. सरस्वती रायच्या रटकळे**
साने गुरुजी विद्याप्रबोधिनी, ता. रावेर, जि. जळगाव

*कोणत्या शब्दात व्यक्त करू,*
*त्यांच्या कर्तृत्वाचे मोल ।*
*क्षितिजालाही हेवा वाटेल,*
*असे कर्तृत्व ज्यांचे अनमोल ।*

पूज्य मधुकरराव चौधरी यांचे कार्य अथांग महासागराप्रमाणे आहे. समाजसेवा व देशसेवा यांनाच ईश्वरसेवा मानून आपले तन-मन-धन अर्पण करून सर्वस्वाचा त्याग करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे मधुकरराव चौधरी होय. ज्यांनी जिद्दीने, निर्धाराने आपल्या ध्येयाकडे पोहोचण्यासाठी धडपड करीत आयुष्यातील खडतर तपश्चर्या व जबरदस्त आत्मविश्वास यांच्या बळावरच समाजाच्या हृदयसिंहासनावर मानाचे स्थान मिळविले. अखंडपणे समाजहित डोळ्यांसमोर ठेवून सतत कार्यमग्न राहणारे थोर व्यक्तिमत्त्व म्हणजे मधुकरराव चौधरी होय. त्यांचे सामाजिक, राष्ट्रीय, शैक्षणिक व जागतिक स्तरावरील राष्ट्रभाषा हिंदीचे व राष्ट्रभाषा प्रचार समितीचे कार्य उल्लेखनीय आहे.

'ज्या संस्थेला आणि भूमीला स्वातंत्र्याच्या इतिहासाचा वारसा आहे, ज्या संस्थेला उत्कृष्ट शिक्षणाचा वारसा आहे, ज्या संस्थेला उत्कृष्ट संस्कृतीचा वारसा आहे, ज्या संस्थेला उत्कृष्ट संस्काराचा वारसा आहे,' अशा या शिक्षण संस्थांमध्ये आपल्याला कार्य करण्याची संधी मिळते म्हणून मी स्वतःला खूप भाग्यवान समजते.

पूज्य मधुकरराव चौधरी यांच्या जीवनाचे अनेक पैलू आहेत. एक माणूस म्हणून ते जगले. त्यांचा आदर्श आज संपूर्ण समाजाला व राष्ट्राला प्रेरणादायी ठरतो. त्यांचे व्यक्तिमत्त्व खूप प्रेरणादायी होते. एक व्यक्ती जीवनाच्या एवढ्या सर्व पैलूंना व अंगांना स्पर्श करून जाऊ शकतो आणि एवढे अफाट कार्य पूज्य



बाळासाहेबांच्या हातून झालेले आहे, त्यांच्या कार्याला तोड नाही.

### मधुकरराव चौधरी यांचे राष्ट्रभाषा हिंदीसाठी योगदान

पूज्य बाळासाहेबांचे राष्ट्रभाषा हिंदी प्रचार व प्रसार समितीसाठी व हिंदीला राष्ट्रभाषा व विश्वभाषा म्हणून मान्यता मिळविण्यासाठी त्यांचे योगदान फार मोठे आहे.

पूज्य बाळासाहेबांच्या मते, हिंदी भाषेच्या माध्यमातूनच संपूर्ण भारतातील लोकांना एकत्र जोडले जाऊ शकते. म्हणून त्यांनी विद्यार्थिदशेपासूनच राज्यात हिंदी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्यास सुरुवात केली.

» १६६५ ते १९७० पर्यंत महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रसार समितीचे (पुणे) अध्यक्ष म्हणून उल्लेखनीय कार्य केले.
» १९७० पासून त्यांच्या मृत्यूपर्यंत महात्मा गांधी यांच्याद्वारा स्थापित अखिल भारतीय राष्ट्रभाषा प्रचार समितीचे (वर्धा) अध्यक्ष म्हणून उल्लेखनीय असे कार्य केले.

### राष्ट्रभाषा प्रचार समिती (वर्धा)

पूज्य बाळासाहेब हे वर्धा येथे शिक्षण घेत असताना महात्मा गांधी, काकासाहेब कालेलकर यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला. त्यामुळे स्वातंत्र्य आंदोलनात साहेबांनी खूप उल्लेखनीय असे कार्य केलेले आहे.

### राष्ट्रभाषा प्रचार समितीची स्थापना

राष्ट्रभाषा प्रचार समितीची (वर्धा) स्थापना १९३६ मध्ये स्वातंत्र्य आंदोलनाच्या वेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी, काकासाहेब कालेलकर यांनी केली. देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी व या देशातील लोकांना आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक बंधनातून मुक्त करण्यासाठी, एक सशक्त चैतन्यशाली राष्ट्र बनविण्यासाठी या प्रचार समितीमार्फत मार्गदर्शन केले जायचे. भारत हा बहुभाषिक देश आहे. विविध भाषांतील लोकांना एकत्र आणण्यासाठी वैचारिक आदानप्रदान करण्यासाठी प्रभावी संपर्क भाषा ही राष्ट्रभाषाच आहे. लोकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण करण्यासाठी राष्ट्रभाषा वापरली जाते.

### राष्ट्रभाषा समितीची उद्दिष्टे

» राष्ट्रीय भावना वाढीस लावून भारतीयांच्या हृदयामध्ये एकात्मता प्रस्थापित करणे.
» राष्ट्रभाषेचा प्रचार व प्रसार करणे.
» राष्ट्रभाषा हिंदीमधून पुस्तके निर्माण करणे.
» उपयोगी साहित्य निर्माण करणे.
» राष्ट्रभाषेच्या परीक्षा घेणे.

» हिंदी माध्यमांचे विद्यालय व महाविद्यालयांची स्थापना करणे.
» संपूर्ण देशात व विदेशात राष्ट्रभाषा हिंदीचा प्रचार व प्रसार करणे.

**राष्ट्रभाषा प्रचार व प्रसार समितीचे बोधवाक्य**

*'एक हृदय हो भारत जननी'*

**राष्ट्रभाषा प्रचार समितीची स्थापना/विश्व हिंदी विद्यापीठाचे भूमिपूजन**

वर्धा शहराजवळ २५० एकर जमीन विश्वविद्यालयासाठी घेतली. विश्व हिंदी विद्यापीठाची स्थापना ही राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या कार्यालयाच्या परिसरातच केली गेली. याचे भूमिपूजन हे त्या वेळचे महाराष्ट्र राज्याचे वित्तमंत्री तथा राष्ट्रभाषा प्रचार समितीचे (वर्धा) अध्यक्ष पूज्य मधुकरराव चौधरी यांच्या हस्ते १८ डिसेंबर १९७८ रोजी झाले. त्या वेळी काकासाहेब कालेलकर, श्रीमती महादेवी वर्मा, डॉ. चेलिशेव, तसेच मॉरिशस, जर्मन, इटली, जपान, फ्रान्स, पोलंड, हंगेरी, थायलंड, इंग्लंड, बेल्जियम अशा विदेशातील हिंदी विद्वान भूमिपूजन सोहळ्यासाठी उपस्थित होते. विश्व हिंदी विद्यापीठ भवन निर्माण करण्यासाठी नागपूर येथील सुप्रसिद्ध वास्तुशास्त्रतज्ज्ञ शिवदान मलजी यांनी मार्गदर्शन केले. त्या वेळी उत्तर प्रदेश सरकारकडून एक लाख रुपयांची देणगी दिली गेली.

भारतभर १४ सप्टेंबर हा दिवस हिंदी दिन म्हणून साजरा केला जातो.

**विश्व हिंदी संमेलनाचे आयोजन**

१. **पहिले विश्व हिंदी संमेलन** – पहिले विश्व हिंदी संमेलन १९७५ मध्ये नागपूर येथे आयोजित केले. या संमेलनाचे उद्घाटन मॉरिशसचे पंतप्रधान सर शिवसागर रामगुलाम यांच्या हस्ते करण्यात आले होते. संमेलनाचे अध्यक्ष हे पूज्य मधुकरराव चौधरी हे होते.
२. **दुसरे विश्व हिंदी संमेलन** – १९७६ मध्ये मॉरिशस येथे आयोजित करण्यात आले. याचे उद्घाटन सर शिवसागर रामगुलाम यांनी केले. याचे अध्यक्ष पूज्य मधुकरराव चौधरी हे होते.
३. **तिसरे विश्व हिंदी संमेलन** – १९८३ मध्ये दिल्ली येथे आयोजित करण्यात आले. याचे उद्घाटन केंब्रीज विश्वविद्यालयाचे (इंग्लंड) डॉ. आर. एस. मॅग्रेगर यांनी केले. याचे अध्यक्षही पूज्य मधुकरराव चौधरी हे होते.
४. **चौथे विश्व हिंदी संमेलन** – हे संमेलन मॉरिशस येथे झाले.
५. **पाचवे विश्व हिंदी संमेलन** – हे संमेलन त्रिनिदादमध्ये झाले.

या सर्व विश्व हिंदी परिषदांचे उद्दिष्ट हेच होते की, हिंदीला आंतरराष्ट्रीय भाषेचा दर्जा मिळावा. त्यासाठी मधुकरराव चौधरी यांनी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली. विश्व हिंदी विश्वविद्यालयाची ध्येयधोरणे व त्याचे नियोजन बाळासाहेबांच्या



नेतृत्वाखाली तयार केले गेले व विश्वविद्यालय स्थापनेविषयी विधेयक त्यांनीच तयार केले आणि महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाची स्थापना वर्धा येथे केली. पूज्य मधुकरराव चौधरी यांनी हिंदीला राष्ट्रभाषा, राजभाषा व विश्वभाषा बनविण्यासाठी लोकांची मानसिकता बदलवून सामाजिक, सांस्कृतिक कार्य विकसित करून राष्ट्रप्रेम जागरूक केले.

मधुकरराव चौधरी यांनी हिंदीबरोबरच इतर भाषांनाही महत्त्व (इंग्रजी) दिले व राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रभाषेचा वापर करून एक सुदृढ राष्ट्र बनविण्यासाठी प्रयत्न केले. देशातील नागरिकांमध्ये स्वाभिमानाची भावना विकसित करून हिंदीला राष्ट्रभाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी खूप मोलाचे कार्य केले.

महात्मा गांधीजींनी स्वातंत्र्य आंदोलनासाठी चौदा सूत्री कार्यक्रम तयार केला होता. त्यातील एक महत्त्वपूर्ण कार्यक्रम म्हणजे राष्ट्रभाषा हिंदीचा प्रचार व प्रसाराचा होता. राष्ट्रभाषा हिंदीचा प्रचार व प्रसार अनेक समाजसुधारकांनी सुरू केला होता; परंतु राष्ट्रीय स्तरावर हिंदी प्रचाराचे कार्य पूज्य मधुकरराव चौधरींनी सुरू केले होते.

दक्षिण भारतातील तमीळ, तेलगू, मल्याळम आणि कन्नड भाषिक प्रदेशांमध्ये दक्षिण भारत हिंदी प्रचारसभा व भारतातील इतर प्रदेशांमध्ये राष्ट्रभाषा प्रचार समितीची (वर्धा) स्थापना करण्यात आली. सुमारे सव्वा कोटी हिंदीतर भाषिक लोकांसाठी हिंदीतून विविध स्तरांवरील ज्ञान दिले गेले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्रभाषा हिंदीला सार्वभौमिक प्रजासत्ताक भारताची राजभाषा म्हणून संविधानद्वारे मान्यता दिली गेली. पूज्य बाळासाहेबांनी आपले सर्वस्व हिंदी भाषेला विश्वभाषा म्हणून मान्यता मिळावी म्हणून अर्पण केले आहे.

राष्ट्रसंघात राष्ट्रभाषेला स्थान मिळण्यासाठी त्यांनी त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत खूप प्रयत्न केले. १९९९ मध्ये इंग्लंड येथे झालेल्या आठव्या विश्व हिंदी संमेलनात त्यांनी हिंदीला विश्वभाषा बनविण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांची व त्यांच्या योगदानासाठी विश्व हिंदी पुरस्काराने त्यांना सन्मानित केले. त्यांच्या प्रेरणेतून संपूर्ण भारतातील जनतेला कार्य करण्याची अखंड ऊर्जा मिळते.

**हम भारतीय अभियान**

महात्मा गांधीजींचे जीवनतत्त्व व कार्यपद्धती मधुकरराव चौधरी यांनी काटेकोरपणे आपल्या जीवनात स्वीकारली. त्यांनी आपल्या जीवनात राष्ट्रहिताला सर्वोच्च स्थान दिले. राष्ट्रभाषा प्रचार समितीने 'हम भारतीय अभियान' हाती घेतले. यातून भारतीय जनतेला स्वातंत्र्य आंदोलनाचा मार्ग दाखविला व त्याप्रमाणे राष्ट्रनिर्मितीच्या जडणघडणीच्या कार्यात आपली भूमिका काय असावी? हे समजण्यासाठी व रुजविण्यासाठी सप्तपदीच्या सात सूत्रांची साहेबांनी निर्मिती केली.

त्यांच्या माध्यमातून भारतीय तरुणांमध्ये राष्ट्रीय ऐक्याची निर्मिती करून मानवता निर्मितीसाठी राष्ट्रभाषेचा वापर करावा आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर राष्ट्रभाषेचा सन्मान होऊ लागला.

बाळासाहेब १८-१८ तास काम करायचे; परंतु ते कधीच थकत नसत. त्यांच्या कार्याचा वारसा आज जपून तो आपण पुढे नेऊया. बाळासाहेबांनी जे वर्धा येथे राष्ट्रभाषा प्रचार समितीचे रोपटे लावले, त्याचे आज वटवृक्षात रूपांतर होताना दिसत आहे.

अशा या सर्वश्रेष्ठ कर्तृत्ववान, निःस्वार्थी शिक्षणमहर्षी, लोकसेवेचा अखंड ध्यास ठेवून ज्यांनी अविरत कार्य केले व आम्हाला सतत प्रेरणा देऊन माझ्या आयुष्यातील आदर्श दीपस्तंभ माझे बाबा पूज्य बाळासाहेबांनी केलेल्या कर्तृत्वाला मी शतशः नमन करते.

PRINCIPAL
SAVE ... VIDYA PRABODHINI
...



७

# शिक्षण आणि बाळासाहेब

**प्रा. साहेबराव त्र्यंबकराव भुकन**
प्र. प्राचार्य, साने गुरुजी विद्याप्रबोधिनी

महाराष्ट्रातील राजकारणाच्या भांगेतील तुळस, सामाजिक परिवर्तनाचे अग्रदूत, महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा पाया घालणारे द्रष्टे, ज्यांच्यामुळे साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्राला वेगवेगळे आयाम, क्षितिजे प्राप्त झाली, ज्यांनी महाराष्ट्राच्या शिक्षणाची दिशा आणि दशा बदलविण्यामध्ये मोलाची कामगिरी पार पाडली, त्या स्मृतिशेष बाळासाहेब चौधरी यांच्या पावन स्मृतीला विनम्र अभिवादन!

इतिहास अशी साक्ष देतो की, समृद्ध परंपरा असलेल्या सुपीक भूमीत काही लोक सतत काही विधायक कार्याचा ध्यास घेऊन ते पूर्ण करण्यासाठी सदैव धडपड करीत असतात. त्यांचे चिंतन, मनन, उक्ती, कृती ही त्याच दिशेने कार्यरत असते, त्यानुसार त्यांची स्वप्ने आकार घेत असतात आणि त्या स्वप्नांच्या पूर्तीसाठी ते अहर्निश कार्य करतात, कष्ट झेलतात. त्यांनी पाहिलेली स्वप्ने आणि ती स्वप्ने साकार करण्यासाठी केलेले विधायक प्रयत्न, हेच त्यांचे मोठेपण आणि वेगळेपण असते. असे विधायक कार्याचे स्वप्न पाहणारे आणि ते स्वप्न साकार करण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावणाऱ्यांपैकी एक म्हणजे खानदेशपुत्र लोकसेवक मधुकरराव चौधरी होत.

साहेबांना उभा महाराष्ट्र ओळखतो, ते शिक्षणमंत्री म्हणून! शिक्षण हा त्यांच्या चिंतनाचा, मननाचा, जिव्हाळ्याचा आणि आवडीचा विषय होता. शिक्षण हे आर्थिक आणि सामाजिक क्रांतीचे अमोघ शस्त्र आहे, यावर त्यांचा दृढविश्वास होता. शिक्षणातून समाजाचा विकास होतोच, यावर त्यांची श्रद्धा असल्यामुळे त्यांनी जाणीवपूर्वक शिक्षणाच्या गुणवत्तेकडे आणि प्रसाराकडे विशेष लक्ष दिले. विकासप्रक्रियेत शिक्षण हा महत्त्वाचा पायाभूत घटक असतो. कोणत्याही प्रकारच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवायची असेल, तर त्याची सुरुवात शिक्षणातूनच करावी